# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१

Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. २४-२२** **दिनांक २७/०१/२०२२**

**सराईत आरोपीतास अटक करुन ४ रिक्षा व ३ मोटारसायकल असे एकुण २,५८,०००/- रुपये किमंतीचे वाहने जप्त करुन ७ गुन्हे उघडकीस- काशिमीरा पोलीस स्टेशन, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.**

दिनांक २६/०१/२०२१ रोजी काशिमीरा पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकातील सपोनि/प्रशांत गांगुर्डे व त्यांचे स्टाफ मिरा-भाईंदर परिसरात वाढलेल्या रिक्षा व बाईक चोरीच्या अनुषंगाने पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे प्रतिबंध गस्त करित असतांना वेस्टर्न हॉटेलच्या बाजूला हाटकेशकडे जाणाऱ्या रोडवर एक धुळीने मळलेली रिक्षा उभी दिसून आली. तिच्यामध्ये एक इसम वय अंदाजे २० वर्षे संशयितरित्या वावरताना मिळून आल्याने त्यास त्याचे नाव-पत्ता विचारता त्याने आपले नाव मुकेश ऊर्फ सोनूकुमार रविंद्र झा, रा - गगनगिरी चाळ, मिनाक्षी नगर, भवानी डेअरी ग्रीन व्हिलेज, काशिगांव, मिरारोड पु, ता. जि. ठाणे असे सांगितले. त्याच्या ताब्यात असलेल्या रिक्षाबाबत विचारपूस केली असता त्याने समाधानकारक उत्तर न दिल्याने पोलीस स्टाफच्या मदतीने त्यास रिक्षासह ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले. सदर संशयित इसमाकडे कौशल्याने तपास केला असता त्याचे ताब्यात मिळुन आलेली बजाज कंपनीची ऑटो रिक्षा नं. MH 02 EW 0306 ही त्याने ०२ महीन्यांपुर्वी काशिमीरा निलकमल नाका येथील सार्वजनिक शौचालयासमोरुन चोरी केली असल्याची कबुली दिली. सदर रिक्षाबाबत काशिमीरा पोलीस ठाणेतील अभिलेख तपासले असता गु.र.नं. I ७९५/२०२१ भा.दं.वि.सं.कलम ३७९ या गुन्ह्यातील चोरीस गेलेली रिक्षा असल्याचे निष्पन्न झाले. सदर इसमास पुन्हा विश्वासात घेवुन अधिक कौशल्यपुर्ण तपास केला असता त्याने काशिमीरा पोलीस स्टेशनचे हद्दीत एकुण ०४ गुन्हे व इतर पोलीस ठाण्याचे हद्दीतील वाहन चोरीचे ०३ गुन्हे केल्याचे कबुली दिली. आरोपीताकडून ०४ ऑटो रिक्षा व ०३ मोटार सायकल असा एकुण २,५८,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. तपासादरम्यान अटक आरोपीताकडून हस्तगत झालेल्या मुद्देमालाप्रमाणे व सांगितल्याप्रमाणे खालील गुन्हे उघडकीस आणलेले आहेत.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा नोंदवही क्रमांक व कलम |
|---|---|---|
| १. | काशिमीरा | गु.रजि.नं ७९५/२०२१ भारतीय दंड संहीता कलम ३७९ प्रमणे |
| २. | काशिमीरा | गु.रजि.नं ८३९/२०२१ भारतीय दंड संहीता कलम ३७९ प्रमणे |
| ३. | काशिमीरा | गु.रजि.नं ६४७/२०२१ भारतीय दंड संहीता कलम ३७९ प्रमणे |
| ४. | काशिमीरा | गु.रजि.नं ९४७/२०२० भारतीय दंड संहीता कलम ३७९ प्रमणे |
| ५. | चारकोप | गु.रजि.नं ३०/२०२१ भारतीय दंड संहीता कलम ३७९ प्रमणे |
| ६. | कुरार व्हिलेज | गु.रजि.नं ८३९/२०२१ भारतीय दंड संहीता कलम ३७९ प्रमणे |
| ७. | नौपाडा | गु.रजि.नं ३६८/२०२१ भारतीय दंड संहीता कलम ३७९ प्रमणे |
| ८. | --- | निळ्या रंगाची बजाज कंपनीची प्लॅटीना दुचाकी वाहन नंबर माहीत नाही चेसीस नंबर MD2DDDZZZPWL32885 इंजन नंबर DUMBPL35696 |

सदरची कामगिरी श्री. अमित काळे, पोलीस उपआयुक्त परिमंडळ-०१, श्री. विलास सानप, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग, मिरा- भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.निरी/श्री. संजय हजारे, पोनि/श्री. विजय पवार (गुन्हे), स.पो.निरी/श्री. प्रशांत गांगुर्डे, सहा.फौज./श्री. प्रकाश कावरे, पो.ना. सचिन हुले, विश्वनाथ जरग, पो.अंम. हनुमंत तेरवे, समीर यादव, सुधीर खोत, अनिल नागरे व सनी सुर्यवंशी सर्व - नेमणुक काशिमीरा पोलीस ठाणे यांनी केलेली आहे.